
Cnemaspis sahyadriensis (निमास्पिस सह्याद्रीएन्सिस)


Cnemaspis maharashtraensis (निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस)


Cnemaspis chandoliensis (निमास्पिस चांदोलीएन्सिस)


Cnemaspis barkiensis (निमास्पिस बर्कीएन्सिस)

# शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांकडून पालीच्या चार प्रजातींचा शोध

## 'झूटॅक्सा' शोधपत्रिकेकडून दखल; विशेषांक प्रकाशित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**


महाराष्ट्रातील वायव्येकडील घाटामधून निमास्पिस कुळातील पालीच्या चार नव्या प्रजातींचा शोध लावण्यात शिवाजी विद्यापीठ आणि ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनमधील संशोधकांना यश आले. याची दखल प्राणिशास्त्राच्या क्षेत्रातील आघाडीच्या 'झूटॅक्सा' या शोधपत्रिकेकडून घेतली असून, ऑकलंड (न्यूझीलंड) येथील या शोधपत्रिकेने केवळ या संशोधनाला वाहिलेला ११४ पृष्ठांचा विशेषांक दि. २६ रोजी प्रकाशित केला.

हे संशोधन अक्षय खांडेकर या विद्यार्थ्याच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागांतर्गत सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग आहे. डॉ. सुनील गायकवाड त्याचे मार्गदर्शक आहेत, तसेच या संशोधनामध्ये ठाकरे


तेजस ठाकरे


अक्षय खांडेकर


ईशान अगरवाल


सतपाल गंगलमाले


सुनील गायकवाड

वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, सतपाल गंगलमाले आणि डॉ. ईशान अगरवाल यांचाही महत्त्वाचा सहभाग आहे. या पाच संशोधकांनी मिळून अ प्रिलिमिनरी टॅक्सॉनॉमिक रिव्हिजन ऑफ दि गिरी क्लेड ऑफ साऊथ एशियन निमास्पिस स्ट्रॉऊच, १८८७ (स्क्वामाटा : गेक्कोनिडे) विथ दि डिस्क्रिप्शन ऑफ फोर न्यू स्पेसीज फ्रॉम साऊथ महाराष्ट्र, इंडिया (A preliminary taxonomic revision of the girii clade of South Asian Cnemaspis Strauch, 1887 (Squamata: Gekkonidae) with the description of four new species from southern Maharashtra, India) हा ११४ पानांचा प्रदीर्घ शोधनिबंध सादर केला. या संशोधनामध्ये निमास्पिस गिरी गटातील इतर नऊ प्रजातींचे नव्याने वर्णन करून जुन्या शोधनिबंधांमधील विसंगती दूर केल्या आहेत.

## आढळक्षेत्रावरून नामकरण

डॉ. गायकवाड व खांडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या पालींच्या वैशिष्ट्यपूर्ण गोल बुबुळांवरून त्यांचा समावेश निमास्पिस या कुळात केलेला आहे. या सर्व प्रजातींचे नामकरण त्या त्या आढळ क्षेत्रावरून करण्यात आले आहे. 'निमास्पिस बर्कीएन्सिस' या प्रजातीचा शोध कोल्हापूरमधील बर्की (शाहूवाडी), वाशी (पन्हाळा) आणि तळ्ये बुद्रुक (गगनबावडा) याठिकाणी लागला आहे. तिचे नामकरण 'निमास्पिस बर्कीएन्सिस' असे करण्यात आले, तर चांदोली राष्ट्रीय उद्यानामध्ये 'निमास्पिस चांदोलीएन्सिस' ही प्रजाती चांदेल रेंजमध्ये, 'निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस' ही प्रजाती रुंदीव रेंजमध्ये आणि 'निमास्पिस सह्याद्रीएन्सिस' ही प्रजाती वेत्ती रेंजमध्ये आढळली.

# कोल्हापुरात पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध

27/03/2024

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्रातील उत्तर-पश्चिमी घाटातून 'निमास्पिस' कुळातील पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध लावण्यात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशन आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरमधील संशोधकांना यश आले. सोबत निमास्पिस गिरी गटातील इतर नऊ प्रजातींचे नव्याने वर्णन करून जुन्या संशोधन निबंधांमधील विसंगती दूर करण्यात आल्या.

नव्याने शोध लागलेल्या पालींच्या वैशिष्ट्यपूर्ण गोल बुब्बुळांवरून त्यांचा समावेश 'निमास्पिस' या कुळात केलेला आहे. यापैकी 'निमास्पिस बर्कीएन्सिस' या प्रजातीचा शोध कोल्हापूरमधील बर्की (शाहूवाडी), वाशी (पन्हाळा) आणि तळये बुद्रूक (गगनबावडा) या ठिकाणांवरून लागला आहे. बर्की राखीव वनक्षेत्रामधील आढळक्षेत्रावरून तिचे नामकरण 'निमास्पिस बर्कीएन्सिस' असे करण्यात आले. 'निमास्पिस चांदोलीएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील चांदेल रेंजमधे आढळली. चांदोली राष्ट्रीय उद्यानातील आढळक्षेत्रावरून तिचे नामकरण 'निमास्पिस चांदोलीएन्सिस' असे करण्यात आले. 'निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील रुंदीव रेंजमधे आढळून आली. महाराष्ट्रामधील आढळक्षेत्रावरून तिचे नामकरण 'निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस' असे केले. तसेच निमास्पिस सह्याद्रीएन्सिस ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या वेत्ती क्षेत्रात आढळली. सह्याद्री व्याघ्रप्रकल्पात स्थित आढळक्षेत्रावरून तिचे नामकरण केले. 'निमास्पिस' कुळातील पाली त्यांच्या प्रदेशनिष्ठतेसाठी ओळखल्या जातात. त्यांचे आढळक्षेत्र छोट्या भूप्रदेशावरती विस्तारले असते. थंडाव्याच्या जागांशिवाय त्या राहू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे आढळक्षेत्र मर्यादित अनुकूल जागांपुरतेच सीमित असते.

या संशोधन मोहिमांमध्ये नव्याने शोधलेल्या पाली त्यांचे आढळक्षेत्र सोडून इतरत्र कुठेही आढळल्या नाहीत. शिवाय चांदोली राष्ट्रीय उद्यानामधून शोधलेल्या तीन प्रजाती एकमेकांपासून फक्त आठ ते बारा किलोमीटर अंतरावरून शोधल्या आहेत. गर्द झाडीच्या जंगलांमध्ये पसरलेल्या उघड्या माळसदृश्य सड्यांनी या प्रजातींचा वावर सीमित केला असावा असा संशोधकांचा प्राथमिक अंदाज आहे. अशी टोकाची प्रदेशनिष्ठता असणे हे निमास्पिस कुळातील पालींचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच या पालींचे आढळक्षेत्र असणारी जंगले संवर्धनाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची ठरतात. या संशोधनामध्ये महाराष्ट्र वनखात्याने आवश्यक परवानगी देऊन सहकार्य केले. तसेच, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामधील (चांदोली राष्ट्रीय उद्यान) वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सर्वेक्षणादरम्यान मोलाची मदत झाली.

हे संशोधन अक्षय खांडेकर यांच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागामधून सुरू असलेल्या पीएचडी संशोधनाचा भाग असून प्रा. डॉ. सुनील गायकवाड मार्गदर्शक आहेत. त्यासोबत या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, सत्पाल गंगलमाले आणि डॉ. ईशान अगरवाल यांचा सहभाग आहे.



**मांडीवरील ग्रंथींची संख्या, पाठीवरील ट्युबरकलच्या रांगांची संख्या, शेपटीच्या खालच्या बाजूला असणाऱ्या खवल्यांच्या रचना आणि विशिष्ट जनुकीय संचांवरून या पाली एकमेकांपासून आणि कुळातील इतरांपासून वेगळ्या प्रजातीच्या आहेत हे स्पष्ट करण्यात यश आलेले आहे. या चारही पाली दिनचर आहेत. झाडांचे बुंधे आणि दगडांच्या आडोशाने त्या राहतात. छोटे कीटक हे त्यांचे प्रमुख खाद्य असल्यामुळे त्या अन्नसाखळीत समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.**

2 7 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांनी शोधल्या पालींच्या चार नव्या प्रजाती

## शिवाजी विद्यापीठास बहुमान : आंतरराष्ट्रीय आघाडीच्या 'झूटॅक्सा' शोधपत्रिकेकडून दखल

■ सकाळ वृत्तसेवा



निमास्पिस सह्याद्रीएन्सिस.



निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस.



निमास्पिस चांदोलीएन्सिस.



निमास्पिस बर्कीएन्सिस.

कोल्हापूर, ता. २६ : महाराष्ट्रातील वायव्येकडील घाटामधून निमास्पिस कुळातील पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध लावण्यात शिवाजी विद्यापीठ आणि ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनमध्ये कार्यरत संशोधकांना यश आले. या संशोधनाची दखल प्राणीशास्त्राच्या क्षेत्रातील आघाडीच्या 'झूटॅक्सा' या शोधपत्रिकेने घेतली आहे. ऑकलंड (न्यूझीलंड) येथील या शोधपत्रिकेने केवळ या संशोधनाला वाहिलेला ११४ पानांचा विशेषांक आज प्रकाशित केला आहे. हा शिवाजी विद्यापीठासह महाराष्ट्रातील युवा संशोधकांचा बहुमान आहे.

याबाबतचे संशोधन अक्षय खांडेकर या विद्यार्थ्याच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागांतर्गत सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग आहे. डॉ. सुनील गायकवाड मार्गदर्शक आहेत. या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, सत्पाल गंगलमाले आणि डॉ. ईशान अगरवाल यांचाही महत्त्वाचा सहभाग आहे. या पाच संशोधकांनी मिळून 'अ प्रिलिमिनरी टॅक्सॉनॉमिक रिव्हिजन ऑफ दि गिरी क्लेड ऑफ साऊथ एशियन निमास्पिस स्ट्रॉऊच, १८८७ (स्क्वामाटा: गेक्कोनीडे) विथ दि डिस्क्रिप्शन ऑफ फोर न्यू स्पेसीज फ्रॉम साऊथ महाराष्ट्र, इंडिया' हा ११४ पानांचा प्रदीर्घ शोधनिबंध सादर केला. या संशोधनामध्ये निमास्पिस गिरी गटातील इतर नऊ प्रजातींचे नव्याने वर्णन करून जुन्या शोधनिबंधांमधील विसंगतीही दूर केल्या आहेत. 'निमास्पिस बर्कीएन्सिस' या प्रजातीचा शोध कोल्हापूरमधील बर्की (शाहूवाडी), वाशी (पन्हाळा) आणि तळये बुद्रुक (गगनबावडा) येथे लागला आहे. बर्की राखीव वनक्षेत्रामधील आढळक्षेत्रावरून तिचे नामकरण 'निमास्पिस बर्कीएन्सिस' असे केले. 'निमास्पिस चांदोलीएन्सिस' ही प्रजाती, चांदोली 'निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील रुंदी व रेंजमध्ये, तर 'निमास्पिस सह्याद्रीएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या वेत्ती रेंजमध्ये आढळली.

### चारही पाली दिनचर

■ मांडीवरील ग्रंथींची संख्या, पाठीवरील ट्यूबरकलच्या रांगांची संख्या, शेपटीच्या खालच्या बाजूला असणाऱ्या खवल्यांच्या रचना आणि विशिष्ट जनुकीय संचांवरून या पाली एकमेकांपासून आणि कुळातील इतरांपासून वेगळ्या प्रजातीच्या आहेत, हे स्पष्ट करण्यात यश आले. या चारही पाली दिनचर आहेत. झाडांचे बुंधे आणि दगडांच्या आडोशाने त्या वावरतात. छोटे किटक त्यांचे प्रमुख खाद्य आहे. त्यामुळे या पाली अन्नसाखळीत समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असे डॉ. गायकवाड यांनी सांगितले.

2 7 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस


निमास्पिस चांदोलीएन्सिस


निमास्पिस बर्कीएन्सिस,


निमास्पिस सह्याद्रीएन्सिस

# संशोधकांकडून पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध

## शिवाजी विद्यापीठ : आंतरराष्ट्रीय आघाडीच्या 'झूटॅक्सा' शोधपत्रिकेकडून दखल; युवा संशोधकांचा बहुमान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील वायव्येकडील घाटामधून निमास्पिस कुळातील पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध लावण्यात शिवाजी विद्यापीठ व ठाकरे वाईल्ड लाईफ फाऊंडेशनच्या संशोधकांना यश आले आहे. याची दखल प्राणीशास्त्राच्या क्षेत्रातील आघाडीच्या 'झूटॅक्सा' या शोधपत्रिकेने घेतली आहे. ऑकलंड (न्यूझीलंड) येथील शोधपत्रिकेने संशोधनाला वाहिलेला ११४ पृष्ठांचा विशेषांक मंगळवारी प्रकाशित केला. हा विद्यापीठासह महाराष्ट्रातील युवा संशोधकांचा बहुमान आहे.

विद्यापीठ प्राणीशास्त्र अधिविभागातील अक्षय खांडेकर यांच्या पीएच.डी. संशोधनाचा हा भाग आहे. डॉ. सुनील गायकवाड त्याचे मार्गदर्शक आहेत. संशोधनामध्ये ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, सत्पाल गंगलमाले व डॉ. ईशान अगरवाल यांचा सहभाग आहे. त्यांनी 'अ प्रिलिमिनरी टॅक्सॉनॉमिक रिव्हिजन ऑफ दि गिरी क्लेड ऑफ साऊथ एशियन निमास्पिस स्ट्रॉऊच, १८८७ (स्क्वामाटा : गेक्कोनीडे) विथ दि डिस्क्रिप्शन ऑफ फोर न्यू स्पेसीज फ्रॉम साऊथ महाराष्ट्र, इंडिया' हा ११४ पानांचा प्रदीर्घ शोधनिबंध सादर केला. यास स्वतंत्र आयएसबीएन क्रमांक मिळाला आहे.

'निमास्पिस बर्कीएन्सिस' प्रजातीचा शोध कोल्हापूरमधील बर्की (शाहूवाडी), वाशी (ता. पन्हाळा) व तळये बुद्रुक (गगनबावडा) याठिकाणी लागला आहे. 'निमास्पिस चांदोलीएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील चांदेल रेंजमध्ये आढळून आली. चांदोली 'निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील रुंदीव रेंजमध्ये आढळली. 'निमास्पिस सह्याद्री एन्सिस' प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या वेत्ती रेंजमध्ये आढळून आली.

निमास्पिस कुळातील पाली त्यांच्या प्रदेशनिष्ठतेसाठी ओळखल्या जातात. त्यांचे आढळक्षेत्र छोट्या भूप्रदेशावर विस्तारलेले असते. थंडाव्याच्या जागांशिवाय त्या तग धरू शकत नाहीत. संशोधन मोहिमेत नव्याने शोधलेल्या पाली त्यांचे आढळक्षेत्र सोडून अन्यत्र कुठे आढळल्या नाहीत. चांदोली राष्ट्रीय उद्यानामधून शोधलेल्या तीन प्रजाती एकमेकांपासून ८ ते १२ किलोमीटर अंतरावर आढळल्या. गर्द झाडीच्या जंगलात पसरलेल्या उघड्या माळसदृश सड्यांनी प्रजातींचा वावर सीमित केला असावा, अशी टोकाची प्रदेशनिष्ठता हे निमास्पिस कुळातील पालींचे वैशिष्ट्य असल्याचे डॉ. गायकवाड व खांडेकर यांनी सांगितले.

### अन्नसाखळीत महत्त्वाची भूमिका

मांडीवरील ग्रंथींची संख्या, पाठीवरील ट्युबरकलच्या रांगांची संख्या, शेपटीच्या खालच्या बाजूला असणाऱ्या खवल्यांच्या रचना व विशिष्ट जनुकीय संचांवरुन या पाली एकमेकांपासून व कुळातील इतरांपासून वेगळ्या प्रजातीच्या आहेत. चार पाली दिनचर आहेत. झाडांचे बुंधे व दगडांच्या आडोशाने त्या वावरतात. छोटे किटक त्यांचे प्रमुख खाद्य आहे. त्यामुळे अन्नसाखळीत समतोल राखण्यात पाली महत्त्वाची भूमिका बजावतात, असे डॉ. गायकवाड यांनी सांगितले.

**निमास्पिस गिरी गटाच्या वैशिष्ट्यांची नव्याने मांडणी**

यापूर्वी झालेल्या संशोधनांमधून निमास्पिस गिरी गटात महाराष्ट्राच्या पश्चिम घाटातून दहा प्रजाती नोंदवल्या होत्या. यापैकी बहुतांश प्रजातींच्या वर्गीकरणामधील विसंगती, चुकांमुळे निमास्पिस गिरी गटातील पालींवर नव्याने अभ्यास करणे आव्हानात्मक होते. संशोधनांतर्गत जुने नमुने तपासण्यात आले. पूर्वीपासून ज्ञात प्रजातींच्या आढळक्षेत्रामधून नव्याने नमुने गोळा करून त्यांच्यात स्थिर राहणारी बाह्य वैशिष्ट्ये नव्याने मांडण्यात आली. याची दखल 'झूटॅक्सा'सारख्या प्रतिष्ठित जर्नलने घेतली, याचा आनंद मोठा असल्याची भावना खांडेकर यांनी व्यक्त केली.

2 7 MAR 2024

तरुण भारत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध

## आंतरराष्ट्रीय 'झूटॅक्सा' शोधपत्रिकेकडून दखल; विशेषांक प्रकाशित

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्रातील वायव्येकडील घाटामधून निमास्पिस कुळातील पालींच्या चार नव्या प्रजातींचा शोध लावण्यात शिवाजी विद्यापीठ आणि ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनमध्ये कार्यरत संशोधकांना यश आले आहे. या संशोधनाची दखल प्राणीशास्त्राच्या 'झूटॅक्सा' या शोधपत्रिकेने घेतली आहे. ऑकलंड (न्यूझीलंड) येथील या शोधपत्रिकेने या संशोधनाचा विशेषांक प्रकाशित केला आहे.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागातील अक्षय खांडेकर यांच्या पीएच. डी. संशोधनाचा भाग आहे. डॉ. सुनील गायकवाड त्यांचे मार्गदर्शक आहेत. या संशोधनात ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, सत्पाल गंगलमाले आणि डॉ. ईशान अगरवाल यांचाही सहभाग



आहे. या पाच संशोधकांनी 'अ प्रिलिमिनरी टॅक्सॉनॉमिक रिव्हिजन ऑफ दि गिरी क्लेड ऑफ साऊथ एशियन निमास्पिस स्ट्रॉऊच, १८८७ (स्क्वामाटा: गेक्कोनीडे) विथ दि डिस्क्रिप्शन ऑफ फोर न्यू स्पेसीज फ्रॉम साऊथ महाराष्ट्र, इंडिया' हा प्रदीर्घ शोधनिबंध सादर केला. या सर्व प्रजातींचे नामकरण आढळक्षेत्रावरुन केले. 'निमास्पिस बर्कीएन्सिस' या प्रजातीचा शोध कोल्हापूरमधील बर्की (शाहूवाडी), वाशी (करवीर) आणि तळये बुद्रुक (गगनबावडा) या ठिकाणी लागला आहे. बर्की राखीव वनक्षेत्रामधील आढळक्षेत्रावरुन तिचे नामकरण 'निमास्पिस बर्कीएन्सिस' करण्यात आले. 'निमास्पिस चांदोलीएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील चांदेल रेंजमध्ये आढळून आली. चांदोली 'निमास्पिस महाराष्ट्राएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानामधील रुंदीव रेंजमध्ये आढळली, तर 'निमास्पिस सह्याद्रीएन्सिस' ही प्रजाती चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या वेती रेंजमध्ये आढळली.

डॉ. सुनील गायकवाड म्हणाले, निमास्पिस कुळातील पाली त्यांच्या प्रदेशनिष्ठतेसाठी ओळखल्या जातात. त्यांचे आढळक्षेत्र छोट्या भूप्रदेशावर विस्तारलेले असते. त्यांचे आढळक्षेत्र मर्यादित अनुकूल जागांपुरतेच सीमित असते. चांदोली राष्ट्रीय उद्यानामधून शोधलेल्या तीन प्रजाती एकमेकांपासून केवळ ८ ते १२ किलोमीटर अंतरावर आढळल्या. या पालींचे आढळक्षेत्र असणाऱ्या जंगलांचे संवर्धन झाले पाहिजे.

### अन्नसाखळीत महत्त्वाची भूमिका

पालीच्या मांडीवरील ग्रंथींची संख्या, पाठीवरील ट्युबरकलच्या रांगांची संख्या, शेपटीच्या खालच्या बाजूच्या खवल्यांच्या रचना आणि विशिष्ट जनुकीय संचांवरुन या पाली एकमेकांपासून वेगळ्या प्रजातीच्या आहेत, हे स्पष्ट केले. या चारही पाली दिनचर आहेत. छोटे किटक त्यांचे प्रमुख खाद्य आहे. त्यामुळे या पाली अन्नसाखळीत समतोल राखण्यात महत्वाची भूमिका बजावतात.

**निमास्पिस गिरी गटाच्या वैशिष्ट्यांची नव्याने मांडणी :** संशोधक अक्षय खांडेकर निमास्पिस गिरी गटात महाराष्ट्राच्या पश्चिम घाटातून पालीच्या दहा प्रजाती नोंदवल्या होत्या. पूर्वीपासून ज्ञात असलेल्या प्रजातींच्या आढळक्षेत्रामधून नव्याने नमुने गोळा करुन, स्थिर बाह्य वैशिष्ट्यांची नव्याने मांडणी केली. याची दखल 'झूटॅक्सा' जर्नलने घेतली आहे....

27 MAR 2024

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी परिक्षार्थी न राहता जीवनमुल्ये जपावीत

## डॉ. विलास शिंदे; कागल येथे पारितोषिक वितरण संपन्न

कागल,ता.२५(प्रतिनिधी)-

वाचा, वेचा, साठवा, सहज आणि सुंदरतेने उपयोग करा. शिक्षणासाठी कुतुहूल गरजेचे असते. केवळ परीक्षार्थी न राहता मानवी शाश्वत जीवनमूल्ये वेचता व टिकवता आली पाहिजेत, असा मौलिक संदेश शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नेताजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दि कागल एज्युकेशन सोसायटी संचलित डी.आर. माने महाविद्यालय, कागल येथे सांस्कृतिक विभागाच्यावतीने वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नेताजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले,बदलत्या काळात संसाधनांचा वापर युवा पिढीने योजनाबद्धरित्या , हेतूपुरस्कर करावा.काळ, वेळेचे आणि नियोजनाचे महत्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.वर्गात आणि वर्गाबाहेर शिकण्याचे आणि अनुभवण्याची कला विद्यार्थी दशेत आत्मसात करावी. वाचनाचा आवाका वाढविण्याचा सल्ला दिला. प्रास्ताविक, स्वागत व प्रमुख पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाच्या प्रभारी प्रा. डॉ. नीला जोशी यांनी केले.विविध खेळ कला, क्रीडा ,एन. एस. एस, एन.सी.सी. शैक्षणिक क्षेत्रामध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थी,विद्यार्थिनी आणि शिक्षकांचा गुणगौरव कुलसचिव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर प्राचार्य डॉ.प्रवीण चौगले यांनी अध्यक्षीय मनोगतात वर्गाबाहेर देखील विद्यार्थी आपल्या अनुभवाद्वारे, निरीक्षणाद्वारे शिक्षण घेतच असतो, हे स्पष्ट केले. एखादी कला व कौशल्ये शिकण्यासाठी सतत प्रयत्न व निरंतरता याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. आजच्या जगात केवळ पदवी प्राप्त झाल्याने यशस्वी होणाऱ्यांची संख्या कमी असून कला कौशल्याद्वारे यशस्वी होणाऱ्यांची संख्या जास्त असल्याचे स्पष्ट करून विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्वाचे संपूर्ण विकास करण्यासाठी अहोरात्र झटण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमास सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. हसीना मालदार , नॅक समन्वयक डॉ. आदिनाथ गाडे,शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा . अमरसिंग रजपूत उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सरस्वती गायकवाड आणि प्रा. संदिप वाडीकर यांनी केले. आभार प्रा. हसीना मालदार यांनी मानले.



कागल येथे वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी बोलताना डॉ. विलास शिंदे, व्यासपीठावर इतर मान्यवर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2024
पुढारी

# शेतमजुराच्या मुलीचे पिकांच्या अळीवर संशोधन

## अकिवाट येथील हिना नदाफ यांच्या प्रयत्नांना यश

**सैनिक टाकळी : पुढारी वृत्तसेवा**



वनस्पतीची प्रतिकार शक्ती अधिक प्रभावी बनवण्यासाठी उपयुक्त अशा इनहिबीटर प्रथिनांचा शोध घेण्यात अकिवाट (ता. शिरोळ) येथील डॉ. हिना लुकमान नदाफ यांना यश आले आहे. शेतमजुराची कन्या असणाऱ्या हिना यांनी पिकांच्या अळीवर शोधलेल्या या संशोधनामुळे भविष्यांत पिकावरील अनेक रोग कमी होणार आहेत. या संशोधनामुळे पिकांमध्ये उपजतच प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होणार आहे.

हिना यांनी पिकातील रस शोषून घेणाऱ्या अळींच्यावर तब्बल चार वर्षे संशोधन केले. त्यांच्या या संशोधनाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान केली. हिना यांचे माध्यमिक शिक्षण विद्यासागर हायस्कूल अकिवाट तर महाविद्यालयीन शिक्षण दत्त महाविद्यालय कुरुंदवाड या ठिकाणी झाले.

बारावीनंतर आपण काहीतरी वेगळे करायचे हा ध्यास हिना त्यांनी ठेवला होता आणि त्यासाठीच त्यांनी जैवतंत्रज्ञान विषयाची निवड केली. इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात बीएस्सीची पदवी घेतल्यानंतर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे जीव रसायनशास्त्र विषयाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केले आहे. हिना यांच्या या संशोधनामुळे पिकांमध्ये उपजतच जर रोगाला प्रतिबंध करणारी शक्ती निर्माण झाली तर ते एक खूप मोठे वरदान असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्रातील परीक्षेला १४,३२३ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षेला १४ हजार ३२३ विद्यार्थी बसले. त्यापैकी १ हजार २३१ विद्यार्थी अनुपस्थित होते. मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत.

मंगळवारी बॅचलर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ व्होकेशन, बॅचलर ऑफ आर्टर्स डिफेन्स स्टडी आदी ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. दि. २६ रोजी या पथकाकडून सांगली (७), कोल्हापूर (१४), सातारा (२) असे मिळून २३ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.